ISSN - No. 2319-9318

*Peer Reviewed International Research Journal*

UGC Approved

# VIDYAWARTA

## *Special Issue.*

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

# Arts,Commerce and Science College, Ashti

Tal.Ashti, Dist.Beed (MS)

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA,
ISO 9001:2015, Green Audited College

**Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends in Social Sciences & Commerce

27th February 2018



# HISTORY AND SOCIOLOGY

Organizer

Ashti Taluka Shikshan Prasarak Mandal's

**Arts, Commerce & Science College, Ashti, Dist.Beed**

Accredited by NAAC B++ Grade with 2.78 CGPA, ISO 9001:2015, Green Audited College

**Organized by**

# One Day Interdisciplinary National Conference on

# Recent Trends in Social Sciences and Commerce

**Tuesday, 27th February, 2018**

**Principal & Organizer**

Dr. S.R. Nimbore

**Convenors**

Prof. D.P. Mundhe    Dr. S.M. Wandhare    Prof. R.S. Satbhai

**Published By**

**Harshwardhan Publication Pvt. Ltd.**

**Limbaganesh, Dist.Beed**

| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रा. सावंत क.डा. | 164 |
| 49 | स्वातंत्र्य संग्रामातील विरांगणा : राणी चेन्नम्मा | प्रा. सोमनाथ गुंजकर | 166 |
| 50 | अधुनिक भारताचे निर्माते | श्री कोळेकर नितीन बापुराव<br>श्री डोंबाळे भरत सुदाम | 169 |
| 51 | रा. ना. प्रणित विसाव्या शतकातील निधर्मी धर्मविचार | अजित लक्ष्मण भालसिंग | 171 |
| 52 | सावित्रीबाई फुलेंची स्त्री मुक्ति चळवळ | भानवसे कृष्णा अंबादास | 173 |
| 53 | भारतीय इतिहासात कर्तृत्त्ववान स्त्रियांचे योगदान | कु. रेणुका प्रकाशराव हाक्के | 177 |
| 54 | भक्ति चळवळीतील संत जनाबाईंचे योगदान | प्रभाकर नारायण शिंदे | 179 |
| 55 | राजश्री शाहू महाराज यांचे सामाजिक कार्य | शेळके जगदीश भाऊसाहेब | 184 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील दलित चळवळी | राठोड गुलाब तातेराव | 187 |
| 57 | श्रीमती इंदिरा गांधीची कामगिरी | डॉ. पी.बी. सिरसट | 189 |
| 58 | पंडिता रमाबाई : कार्य आणि कर्तृत्त्व | सुर्यवंशी सुमित्रा भगवानराव | 192 |
| 59 | भारतीय इतिहासातील सामाजिक सुधारणेत स्त्रियांचे योगदान | डॉ. सखाराम मारुती वांढरे | 195 |

# स्त्रीवादी इतिहासलेखन

प्रा. सावंत के.डी.
इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, गेवराई.

**प्रस्तावना :**

भारतात २० व्या शतकाच्या उत्तरार्धात परंपरागत इतिहास लेखनाला छेद देणारा नवीन इतिहास लेखनाला छेद देणारा नवीन इतिहासलेखन प्रवाह पुढे आला. याच प्रवाहाला 'सबाल्टर्न' संबोधले गेले. इटालियन मार्क्सवादी अंतनिओ ग्रामची यांनी ही संकल्पना इतिहासाच्या संदर्भात वापरली या नव्या संज्ञेच्याद्वारे शोषित, अंकिताचा इतिहास लिहिण्याचा नवा दृष्टीकोन विकसीत झाला. मार्क्सवादी ग्रामचीच्या विचार प्रणालीद्वारे भारतातील शोषित अंकिताचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला. या इतिहास लेखनाचे प्रवर्तक रणजित गुहा यांनी इ.स. १९८२ मध्ये सबाल्टर्न स्टडीजच्या लेखन संपादनाचा प्रकल्प हाती घेतला. या लेखनात रणीज गुहा, गायत्री चक्रवर्ती कमला विश्वेशरण, दीपक चक्रवर्ती यांनी स्त्रीप्रश्नाविषयी चर्चा केल्याचे दिसते.

प्रस्तुत शोध निबंधात स्त्रीवादी लेखनाबरोबरच जात, वर्ग, पुरूषता, वसाहतकाळ यांचा परस्पर संबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रिवादी इतिहासलेखनाची व्याख्या करतांना डॉ. राजा दिक्षितच्यामते, "मानवी वास्तवाच्या अकलनासाठी प्रदेश, वंश धर्म, वर्ग इत्यादी विविध प्रवर्ग लक्षात घेतले जातात. त्यात दुर्लक्षित राहिलेला लिंगभाव या प्रवर्गावर भर देवून इतिहास लेखन करणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी इतिहास लेखन होय."[१] स्त्रीवाद हा पुरूषापेक्षा स्त्रियांना दुय्यमत्व का आणि कसे लेखण्यात आले याचे विश्लेषण व त्याचबरोबर हे असंतुलन कसे नष्ट करता येईल यासाठी कोणती आव्हाने स्वीकारावी लागतील यावर प्रकाश टाकणारा लेखन प्रवाहआहे. "स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे विश्लेषण करणारे एक सुसंगत राजकीय विचारप्रणाली असे स्त्रीवादाचे रूप नसून स्त्रियांना त्यांचे खरे श्रेय मिळावे म्हणून झडणारी ही एक प्रकारे राजकीय बांधीलकी"[२] असे मत प्राती करमारकर यांनी मांडले.

इ.स. १९७५ हे वर्ष जागतिक स्तरावर 'स्त्रीवर्ष' मानले गेले. भारतात ही या वर्षानंतर स्त्रीविषयक प्रश्नांचा वेध घेण्यात आला. यातूनच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे वास्तव उघडे झाले. त्यामुळे स्त्रीवादी चहवळीला उठाव मिळाला. स्त्रीवादी इतिहास लेखनाने प्रस्थापित इतिहास लेखनातील स्त्रियांच्या स्थानांचा शोध घेऊन चिकित्सा केली. पुरूष प्रधानता, लिंग, लिंगभाव या संकल्पनांची नव्याने मांडणी केली. आणि स्त्रीवादाचे सम्यक स्वरूप पुढे आणण्याचा प्रयत्न केला.

शोषित अंकितांना प्राधान्यक्रम देवून त्यांच्या विद्रोहाचा प्रतिकाराचा इतिहास लिहिण्याच्या प्रक्रियेत सबाल्टर्न अभ्यासकांनी प्रारंभीच्या खंडामध्ये स्त्री प्रश्नाला स्थान दिले नाही. चक्रवर्ती स्पिवाक यांच्या चौथ्या खंडामधील लेखनाने सबाल्टर्न स्टडीजच्या दोषावर बोट ठेवले. शोषित, अंकित जणांना पुरूषांचा समूह म्हणून पेश केले. त्यातील लिंगभेदाचे अधिष्ठान त्यांनी पडताळले नव्हते. या वास्तवाकडे चक्रवर्ती स्पिवाक यांनी लक्ष वेधले.[३] चक्रवर्ती स्पिवाक यांच्या टिकेनंतर सबाल्टर्न स्टडीजच्या पाचव्या खंडापासून स्त्री विषयांना स्थान मिळू लागले. महाश्वेतादेवी यांच्या 'स्तनदायीनी' या कथेवरील लेखात चक्रवर्ती स्पिवाक मार्क्सवादी सिध्दांत चोकटीतील श्रमविभागणी आर्थिक शोषण या संकल्पनातून दायीचा स्तनपानाच्या श्रमाचा अर्थ लागत नसल्याचे दाखवून देतात. 'चंद्राचा मृत्यु' हा रणजित गुहा यांचा लेख स्त्री जीवनाचा व तिच्या जाणिवेचा उलगडा करण्याचा एक महत्वपूर्ण प्रयत्न आहे.[४]

पराधीन आत्मनिष्ठेच्या दबावाखाली स्त्री स्वतःची आत्मकल्पना मिळवू शकत नसल्याने शोषित अंकितजण त्यांचे म्हणणे मांडू शकत नाहीत. या चक्रवर्ती स्पिवाक यांच्या भूमिकेची मतभेद व्यक्त करीत राष्ट्रीय चळवळीतील स्त्री सहभागाचे मार्मिक विश्लेषण कमला विश्वेशरण यांनी सबाल्टर्न स्टडीजच्या नवव्या खंडातील त्यांच्या लेखात केले आहे. या लेखात त्यांनी जातीव्यवस्थेने स्त्रियांवर लादलेल्या विषमतेची दखल घेतली. तसेच पितृसत्ताक भूमिकेवर आधारलेल्या राष्ट्रवादी इतिहास लेखनाची चिकित्सा केली. समकालीन राजकारणातील जात लिंगभावाचे मुद्दे उलगडून दाखवणारा सुझी थारू आणि तेजस्विनी निरंजन यांचा या खंडातील लेख महत्वाचा आहे.[५]

सुदेश वैद्य, कुंकुम संगारी हे स्त्रीवादी, स्त्रिविषयक स्त्रीकेंद्री यांना वेगळ्या दृष्टीकोनातून पाहतात. 'स्त्रीवादी इतिहास' लेखाचे विविध पैलू उलगडून दाखवितांना लिंगभावात्मकतेतील कळीच्या मुद्याला हात घालतात. 'स्त्रियांचा वा स्त्रीविषयीचा' इतिहास नसतांना सुध्दा इतिहासलेखनशास्त्र स्त्रीवादी असू शकते. स्त्रीवादी इतिहासलेखन हे जाणते की प्रत्येक वास्तव लिंगभावावर आधारित असते पण प्रस्थापित इतिहासलेखन लिंगभावात्मक फरक करताना दिसते. तरीही स्त्रीवादी इतिहासलेखनाशास्त्र सर्व इतिहासकारांसाठी साचेबध्दपणा न आणता खुलेपणा ठेवते. कोणत्याही साच्यात स्त्रीवादी अभ्यासाला बसू देत नाही.[६]

ISSN - 2319 9318

स्त्रियांच्या दुय्यमत्वाचा ऐतिहासिक शोध घेतांना विद्युत भागवत यांनी स्पष्ट केले की, मातृत्व आणि स्त्रिची लैंगिकता यामध्ये काटेकोर भेद करून अधिकृत मातृत्वासाठी स्त्रीच्या लैंगिकतेला बांध घातला गेला. एकेकाळी स्त्रियांच्या जनन क्षमतेचा उदो-उदो करणारी भारतीय संस्कृती स्त्रियांच्या रजस्त्रावला विटाळ मानू लागली. स्त्रियांची लैंगिकता काटेकोरपणे नियंत्रित करून वारसाहक्काचा प्रश्न बीजशुध्दीच्या मार्गाने शोधू लागले. तिला शुध्दतेच्या व पावित्र्याच्या चौकटीत जखडले गेले.[७]

२० व्या शतकातील प्रसिध्द स्त्रीवादी इतिहासकार उमा चक्रवर्तीचा इतिहासातील गोष्टीकडे स्त्रीवादी दृष्टिकोनातून बघून त्याचे विश्लेषण करण्यात हातखंडा आहे. एकोणिसाव्या शतकातील पंडिता रमाबाईच्या काळातील स्त्रियांचे पितृसत्तेने केलेले शोषण त्यांनी पुढे आणण्याचा प्रयत्न केला. यासाठी जात, वर्ग, लिंगभाव या कोटीक्रमाचा सातत्याने उपयोग केलेला दिसतो.[८]

स्त्रीमुक्ती चळवळीतून स्त्रीवादी अभ्यासक्रम अथवा स्त्रियांविषयी माहिती गोळा करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यात समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहासतज्ज्ञांचा समावेश दिसून येतो. त्यातील बरेच तज्ज्ञ स्त्रीवर्गातून पुढे आल्याचे दिसते. जाती विषमतेप्रमाणेच लिंगसापेक्ष विषमता ही स्त्रियांवर लादलेली असते. त्यातून स्वतःची सुटका करून जुन्या माहित असलेल्या गोष्टीकडे नव्या दृष्टीकोनातून पाहाण्यात तर नवीन सुरूवात करण्यासाठी नवीन पायवाट तयार करावी लागते. अर्थात असे विश्लेषण करण्यास एकदा ती दृष्टी निर्माण झाली की, केवळ स्त्रीविषयक नाही तर अनेक विषमतांना मांडण्याचे भान येते. त्यादृष्टीने बऱ्याच स्त्रीवादी लेखकांनी स्त्रीवादी इतिहास लेखनाचे परखडपणे विश्लेषण केल्याचे जाणवते.

**सारांश :**

जागतिक आणि भारतीय इतिहास लेखनात अजूनही स्त्रीवादी दृष्टिकोन ठेवून फारसे ठोस काम झाल्याचे दिसून येत नाही. प्राचीन इतिहासावर त्यांचे प्रभूत्व आहे पण मध्ययुगीन आणि वसाहतवादापूर्वीच्या इतिहासावर फारसे काम झालेले दिसत नाही हे स्त्रीवादी इतिहासकारांसमोरिल फार मोठे आव्हान आहे. कारण इतिहासाच्या फार मोठ्या कालखंडाकडे नव्या दृष्टीने समतोल वृत्तीने पाहण्याची गरज आहे. तेंव्हाच स्त्रीवादी इतिहास लेखनाला पूर्णतः न्याय मिळू शकेल असे वाटते.

**संदर्भसूची :-**


१) डॉ. भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधरणावादाचे सत्ताकारण, पुणे, २००८, पृष्ठ ४९.

२) करमरकर प्रीती, स्त्रिवादी सिद्धांकन आणि ज्ञाननिर्मिती, पुणे, १९९९, पृष्ठ ७.

३) बगाडे उमेश, सबाल्टर्न स्टडीज व भारतीय इतिहासलेखनातील थित्यंतर, २००७, पृष्ठ २१०.

४) कित्ता, पृष्ठ ३१०.

५) कित्ता, पृष्ठ ३११.

६) डॉ. भोसले नारायण, उपरोक्त, पृष्ठ. ५०.

७) कित्ता, पृष्ठ ४९.

८) दामले वासंती, स्त्रिवादी इतिहासकार, उमा चक्रवर्ती, दै लोकसत्ता, दि. ३१ जानेवारी २००९.